**<u>फिर्यादी नाना उर्फ नानासाहेब माधव नेटके यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. पी.जी.मोरे यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>** –

११. प्रस्तुत प्रकरणात माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यातील मजकुर माझे सांगणेप्रमाणे लिहीण्यात आला. त्यावर मी वाचुन सही केली. त्यातील मजकुर बरोबर आहे.

१२. आता मला यादी नि. क्र.३/१ व २ वरिल धनादेश दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.२३ व २४** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/३ व ४ वरिल बँकेचे रिटर्न मेमो दाखविले. त्यावर बँकेच्या शाखाधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.२५ व २६** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/५ वरिल नोटीस पोस्टाचे आर.एल.पावतीसह दाखविली. त्याला **नि.२७** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/६ वरिल पाकीट दाखविले. त्याला **नि.क्र.२८** देण्यात आले. फिर्यादी व फिर्यादीचे विधीज्ञ यांचे समक्ष सदर पाकीट उघडण्यात आले व त्यातील नोटीस बाहेर काढण्यात आली. त्यावर माझी व माझे विधीज्ञांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२९** देण्यात आला. नि.क्र.१९ वरिल यादी सोबत अ.क्र.१ ते १३ नुसार मुदत ठेवीच्या पावत्यांची पडताळणी केलेल्या प्रती दाखल केलेल्या आहेत. त्या पावत्यामधील मुदत ठेवी माझे आणि माझे कुटुंबीयांचे नावे आहेत. त्याच्या मुळ पावत्या मी सोबत आणलेल्या आहेत. त्याला **नि.क्र.३० ते ४२** देण्यात आल्या.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञांनी उलटतपास घेण्यास पुढील तारीख मिळण्यासाठी अर्ज दाखल केला. सदर अर्ज बचाव पक्षाने पुढील तारखेस न चुकता उलटतपास घेण्याच्या अटीवर शेवटची संधी म्हणुन मंजुर. उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

साक्षीदाराचा जबाब नोंदवितांना डायसलगतचे स्क्रीन व भिंतीवरील स्क्रीन चालु केले होते व त्यांचे समक्ष संगणकावर साक्ष नोंदवण्यात आली.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/-

( माधुरी रा. खनवे )

दिनांक ०८/१२/२०२५ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०४, अहमदनगर